MHSO100022602022

**<u>नि.दि.दा.क्र.६३५/२०२२ मधील नि.क्र.४५ खालील आदेश</u>.**

वादींचे वारसांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे, क्रम–६, नियम–१७ प्रमाणे मयत वादी क्र.१ सर्जेराव पंढरीनाथ दुरापे याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी व संबंधित दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, वादी क्र.१ हा ता.२२.०१.२०२५ रोजी मयत झाला असून त्यांचे वारस सदरच्या दाव्यात अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्याला १ मुलगा व ४ मुली वारस आहेत. त्याची पत्नी मयत आहे. त्यामुळे त्यांची नावे दाव्यात वादी क्र.१ चे वारस म्हणुन समाविष्ट करण्यास व त्याबाबत दुरुस्ती करण्यास त्यांनी परवानगी मागितली आहे. वादींना पुढीलप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे. वादी क्र.१ चे नावास कंस करुन त्याच्यापुढे मयत वारस असे लिहिण्यास व १अ) अमोल सर्जेराव दुरापे, वय–३० वर्षे, १ब) सौ.निर्मला संतोष मोरे, वय–३२ वर्षे, १क) सौ.संध्या शिवाजी जगताप, वय–२९ वर्षे, १ड)सौ.रुपाली बंटी मोरे, वय–२७ वर्षे, १इ) दिपाली सचिन चव्हाण, वय–२५ वर्षे, सर्वांचा धंदा–शेती, वादी क्र.१अ रा.लवंग, ता.माळशिरस, जि.सोलापूर, वादी क्र.१ब रा.तरडगाव, ता.करमाळा, जि.सोलापूर, वादी क्र.१क–रा.कोणतीबोबलाद, ता.जत, जि.सांगली, वादी क्र.१ड–रा.खेड, ता.कर्जत, जि.अहिल्यानगर, वादी क्र.१इ–रा.सवतगव्हाण, ता.माळशिरस, जि.सोलापूर. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादींनी जबाब दिलेला असून त्यामध्ये म्हटले आहे की, सदरचे अर्जास त्यांची हरकत असुन सदरचा अर्ज कायदेशीर नाही. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयांवर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहेः–

| अ.क्र | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |
| २. | आदेश काय? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

### मुद्दा क्र.१ बाबतः–

४. मी वादीचे वारसांतर्फे विद्वान वकील श्री.पाटोळे व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री.कदम यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. वादी क्र.१ हा ता.२२.०१.२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. वादीचे वारस वर नमुद केल्याप्रमाणे असल्याचे दिसुन येते. वादीचे वारसांना प्रतिवादींच्या विरुध्द सदरचा दावा चालविण्याचा अधिकार आहे. सदरच्या नियोजित दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होत नाही. तसेच प्रतिवादीवर अन्याय होत नाही. त्यामुळे वादीच्या वारसांची नावे मयत वादीचे वारस म्हणुन दाव्यात

समाविष्ट करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबतः–**

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदरचा नि.क्र.४५ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.04.23 18:10:07 +0530

दि.२३.०४.२०२६. (सोपान द. घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माळशिरस.

**<u>नि.दि.दावा क्र.६३५/२०२२.</u>**

**<u>नि.क्र.४५ खालील आदेश</u>**

.

शेरा

मी शपथेवर सांगते की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावःश्री. म. पां. सदाफुले.

न्यायालयाचे नावःदि. न्या. व. स्तर, माळशिरस.

आदेशाचा मजकूर सांगितल्याचा दि.२३.०४.२०२६.

आदेश टंकलिखित केलेला दि.२३.०४.२०२६.

आदेश स्वाक्षरित केल्याचा दि.२३.०४.२०२६.

आदेश अपलोड केल्याचा दि.२३.०४.२०२६.

स्वाक्षरित/–

(श्री. म. पां. सदाफुले )

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.